महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कार्यकारी संपादक : श्री. विजय यादव | jeevandeepvartanews2020@gmail.com | मुख्य संपादक : श्री. रविंद्र घोडविंदे | Rs.2/-

सोमवार ❖ २६ ऑगस्ट २०२४ ❖ वर्ष ६ ❖ अंक - ०६३ ❖ पाने - ४

RNI NO : MAHMAR/2016/72091 Postal Reg. No. THC/256/2022-2024

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मध्ये कंपनी, मिळकत, जमीन- जुमला, सहकारी संस्थांच्या नोटीस तसेच बक्षीसपत्र, घटस्फोट, पोटगी, नावात बदल आदी कायदेविषयक छोट्या जाहिरातीना केवळ ५००/- रुपयांत प्रसिद्धी दिली जाईल; कोणत्याही शासकीय नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क साधा.

:: कार्यालय ::

९६१९१८८५५८ / ९१५८०७८६०१

E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com
news.thanejeevandeep@gmail.com

# विधानसभेसाठी भाजपची नवी रणनीती

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**□ प्रतिनिधी**

मुंबई : आतापर्यंत वापरल्या जाणाऱ्या पद्धतीला थोडा खो देत विधानसभा जिंकण्यासाठी भाजपने नवीन रणनीती आखली आहे. टूलकिट हा त्यातील कळीचा शब्द आहे. या शिवाय देशाच्या विविध भागातील नेत्यांना प्रवासी नेते म्हणून महाराष्ट्रात उतरविले जाणार आहे. विधानसभा मतदारसंघ असा फोकस न करता पंचायत समिती सर्कल फोकस करून प्रचारयंत्रणा, संपर्कयंत्रणा राबविली जाणार आहे. पक्षातील असे नेते जे गटबाजी करतात अशांबाबतचा अहवाल पक्षाकडे गेला आहे. त्यांना महत्त्व दिले जाणार नाही. निवडणुकीच्या राजकारणाचा अनुभव असलेल्यांना लोकसभा निवडणुकीत डावलले गेले अशा तक्रारी होत्या, आता या अनुभवी व्यक्तींना अधिक जबाबदारी देण्याचे ठरले आहे. नेत्यांपेक्षा कार्यकर्ता हा बेस राहील, असेही सूत्रांनी सांगितले.

विविध राज्यांमधील नेत्यांना उतरवणार विविध राज्यांमधील नेत्यांना निवडणूक जाहीर झाल्यानंतर प्रचारकार्यात शेवटच्या वीसेएक दिवसात उतरविले जात असे. दिवस कमी असल्याने पक्षाची स्थानिक यंत्रणा आणि हे बाहेरून आलेले नेते यांच्यात समन्वय स्थापित होणे कठीण जायचे. या उलट बरेचदा वादही होत असत. हे लक्षात आल्यानंतर अन्य राज्यातील मोठ्या नेत्यांना आतापासूनच निवडणुकीच्या तयारीसाठी उतरविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. भाजपच्या बैठकांवर बैठक सुरु दोन दिवसांपूर्वी नागपुरात एक बैठक झाली. केंद्रीय सहसंघटन मंत्री शिवप्रकाश, मध्य प्रदेशचे प्रभावी नेते कैलाश विजयवर्गीय, प्रल्हाद पटेल, विश्वास



नारंग, खा. फग्गनसिंह कुलस्ते तसेच तेथील पक्षाचे संघटन मंत्री हितानंद शर्मा, तेलंगणाचे संघटन मंत्री चंद्रशेखर, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या टीममधील ऋत्विक मेहता आणि विदर्भातील आठ पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. सोमवारी एक महत्त्वाची बैठक मुंबईत होणार आहे. प्रत्येक विभागात अन्य राज्यांतील नेते (प्रवासी नेते) उतरविले जातील.

असा असेल फॉर्म्युला १५-३००-१५०- ४५०० - आतापर्यंत निवडणुकीत भाजपच्या दृष्टीने बूथप्रमुख हा महत्त्वाचा घटक असायचा. बूथप्रमुखांची रचना कायम ठेवली जाणार असली तरी त्याला समांतर एक वेगळी रचना आता करण्यात आली आहे. - राजकीय समज एकदम पक्की असलेल्या १५ जणांची एक टीम प्रत्येक विधानसभा मतदारसंघात तयार केली जात आहे. - त्यात निवडणुका जिंकण्याचा, लढण्याचा अनुभव असलेले स्थानिक नेते आणि इतर जाणकार प्रमुख कार्यकर्ते, नेते असतील. हे टूलकिट क्रमांक एक असेल. या १५ जणांपैकी प्रत्येक जण ३०० जणांची टीम तयार करेल, हे टूलकिट क्रमांक २ असेल. - हे ३०० जण मग प्रत्येकी १५० या प्रमाणे ४५ हजार जणांच्या टीम तयार करतील. हे सगळे जण एका ?पवर जोडले जातील आणि ते सातत्याने एकमेकांच्या संपर्कात असतील. - बूथप्रमुख पक्षासाठी कष्ट खूप करतो; पण लोकांना प्रभावित करणे, त्यांना पक्षाकडे खेचून आणण्याबाबत तो कमी पडतो हे लक्षात आल्यानंतर आता ही वेगळी रचना करण्याचे ठरले आहे. प्रत्येक विधानसभा मतदारसंघात कमीत कमी १५०० महिलांच्या उपस्थितीत १५ मेळावे घेण्यात येणार आहेत.

# "अत्याचारी कोणीही असो सुटता कामा नये"

## - अत्याचाराच्या घटनेवरुन मोदींचा संताप !

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**□ वृत्तसेवा**

बदलापूरमधील बलात्काराच्या घटनेने महिलांवरील अत्याचाराचा मुद्दा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. महिलांवरील वाढत्या हिंसाचाराच्या घटनांवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चिंता व्यक्त केली.

जळगाव येथील सभेत बोलताना मोदींनी महिलांवर अत्याचार करणाऱ्यांना आणि त्यांना मदत करणाऱ्यांना कडक इशारा दिला.

जळगाव येथील सभेत बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले, 'महिलांचे सामर्थ्य वाढवण्याबरोबरच त्यांच्या सुरक्षेलाही देशाचा प्राधान्यक्रम आहे. मी लालकिल्ल्यावरूनही सातत्याने हा विषय मांडला आहे. आपल्या महिला आणि मुलींच्या वेदना, त्यांचा राग मला समजत आहे.'

### आरोपींना मदत करणाऱ्यांना मोदींनी दिला इशारा

'मी पुन्हा एकदा देशातील प्रत्येक राजकीय पक्षाला आणि राज्य सरकारांना आवाहन करतो की, महिलांवरील हिंसा अक्षम्य पाप आहे. दोषी कुणीही असो, तो सुटता कामा नये. त्याला कोणत्याही स्वरुपाची मदत करणारे सुटता कामा नये', असा इशारा मोदींनी दिला.

'रुग्णालये असो, शाळा असो, कार्यालये असो वा पोलीस प्रशासन, ज्या पातळीवर कामचुकारपणा होईल, त्या सगळयांचा हिशोब व्हायला हवा', असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

'वरपासून खालपर्यंत स्पष्ट मेसेज जायला पाहिजे. हे खूप अक्षम्य आहे. सरकार येतील आणि जातील. पण, जीवनाची आणि महिलेच्या सन्मानाचे रक्षण, हे समाज आणि सरकारच्या माध्यमातून आपल्या सगळयांची जबाबदारी आहे', असे आवाहन मोदी यांनी केले.

### आरोपींना शिक्षा होण्यासाठी कडक कायदे केले -मोदी

'अल्पवयीन मुलींवर होणाऱ्या अत्याचारासाठी फाशी आणि जन्मठेपेच्या शिक्षेची तरतूद केली आहे. लग्नाचे आमिष दाखवून केलेल्या अत्याचाऱ्याच्या बाबतही कठोर कायदा केला आहे. आधी यासंबंधी कायदा नव्हता. पण आता नव्या कायद्यात स्पष्ट करण्यात आलं आहे. केंद्र सरकार महिलांविरोधातील अत्याचार रोखण्यासाठी राज्य सरकारच्या सोबत आहे. पापाची ही मानसिकता आपल्याला थांबवावी लागेल,' असा निर्धार नरेंद्र मोदींनी केला आहे.

# बदलापुरात दहीहंडीचा 'साऊंड बंद'!




**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**□ प्रतिनिधी**

**बदलापूर**- दहीहंडी उत्सव तोंडावर आला आहे. मात्र बदलापूर मध्ये दोन शाळकरी चिमुरड्यांवर झालेल्या अत्याचार घटनेच्या निषेधार्थ बदलापूर साऊंड असोसिएशन सामाजिक बांधिलकी जपत यंदा उत्सव साजरा न करण्याचा निर्णय घेतला आहे. दहीहंडी उत्सव निमित्ताने घेतलेली कामे त्यांनी रद्द केली आहेत. त्याविषयी बॅनर बदलापूर स्टेशन परिसरात लागले आहेत.

दहीहंडी उत्सवाची लगबग सगळीकडे सुरू झाली आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांनी देखील मोठमोठ्या हंड्या आयोजित केल्या असून दणक्यात हा उत्सव साजरा करण्याची तयारी केली आहे. मात्र काही दिवसांपूर्वीच बदलापूर शहरात एका नामांकित शाळेत दोन चिमुरड्यांवर शाळेतील सफाई कामगाराने दुष्कृत्य केलं आहे. या घटनेमुळे बदलापूर शहर धुसफूसत आहे. त्याचे वतावरण अद्याप निवळले नसून तोंडावर दहीहंडी उत्सव आला आहे. बादलापूर पान ४ वर ▶▶

# सरकारी कर्मचाऱ्यांना केंद्राप्रमाणे सुधारित निवृत्ती वेतन योजना लागू



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे मंत्रिमंडळ बैठक झाली. या बैठकीत राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना केंद्राप्रमाणे सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू करण्याच्या सोबतच अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत.

### राज्य मंत्रिमंडळ बैठकीतील महत्त्वाचे निर्णय

राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना केंद्राप्रमाणे सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू. मार्च २०२४ पासून अंमलबावणी. लाखो कर्मचाऱ्यांना फायदा

- राज्यातील जास्तीत-जास्त शेतकऱ्यांना दिवसा अखंडित वीज देणार. योजनेची व्याप्ती वाढवली.
- गटप्रवर्तकांच्या मानधनात ४ हजारांची भरीव वाढ
- ऑलिंपिकवीर स्व. पै.खाशाबा जाधव कुस्ती संकुलाच्या कामास वेग देणार
- थकीत देण्यासाठी पान ४ वर ▶▶

# उल्हासनगर मध्यवर्ती रुग्णालयातील डॉक्टरांची चौकशी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

उल्हासनगर : बदलापूर येथील शाळेत दोन अल्पवयीन मुलींवर झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणाची सखोल चौकशी राष्ट्रीय बालहक्क संरक्षण आयोगाकडून केली जात आहे. या प्रकरणात अधिक तपशीलवार माहिती मिळवण्यासाठी आणि पुरावे गोळा करण्यासाठी आयोगाने उल्हासनगरच्या शासकीय मध्यवर्ती रुग्णालयातील १० पेक्षा अधिक अधिकारी व कर्मचाऱ्यांना चौकशीसाठी बोलावले आहे.

या घटनेतील पीडितांना तपासणीसाठी या हॉस्पिटलमध्ये आणले गेले होते. त्यांच्या स्थितीबद्दल अधिक माहिती मिळवण्यासाठी आणि घटनास्थळी नेमके काय घडले याचा शोध घेण्यासाठी आयोगाने हे पाऊल उचलले आहे.

शनिवारी आयोगाने हॉस्पिटलचे अधीक्षक, डॉक्टर, सुरक्षारक्षक, वॉर्डबॉय आणि इतर कर्मचाऱ्यांना चौकशीसाठी मुंबईत बोलावले होते. सकाळपासून संध्याकाळपर्यंत हे सर्वजण मुंबईत होते, जिथे त्यांचे जबाब नोंदवले गेले. या मुलींना कसे आणले गेले, त्यांच्यावर कोणती उपचार प्रक्रिया राबवली गेली. उपचारांमध्ये दुर्लक्ष झाले का किंवा राजकीय किंवा इतर कोणता दबाव आला का, याचीही चौकशी केली जात आहे. बालकांचे संरक्षण आयोगाचे अध्यक्ष रूपाली बनर्जी सिंह यांनी या प्रकरणाची दोन दिवसांपासून सखोल चौकशी सुरू ठेवली आहे. शुक्रवारी, त्यांनी बदलापूरला भेट दिली आणि शिक्षण विभागाचे अधिकारी, शाळेची मुख्याध्यापिका, शिक्षक आणि आया यांची बदलापूर येथे जवळपास सहा तास चौकशी केली.

असंवेदनशीलता दिसून येते. तसेच, या अल्पवयीन मुलींवर उपचार करण्यासाठी रुग्णालयाने १२ तासांचा वेळ घेतला असल्याचेही सूत्रांनी सांगितले.

समिती सदस्य आणि बाल हक्क आयोगाच्या अध्यक्ष सुशीबेन शाह यांनी 'नवशक्ति'ला सांगितले की, आम्ही अहवाल सरकारला सादर केला आहे. शाळा, रुग्णालय, पोलीस किंवा सरकार या सर्वच स्तरांवर मोठ्या चुका आढळल्या आहेत. आम्हाला अपेक्षा आहे की, शाळेच्या प्रशासन आणि व्यवस्थापनाविरुद्ध कठोर कारवाई केली जाईल. सरकार या अहवालाचा आढावा घेईल आणि तो पोलीस विभागाकडे सुपूर्द करेल, असे शालेय शिक्षण राज्यमंत्री दीपक केसरकर यांनी सांगितले. ते म्हणाले की, पुढील आठवड्यात समितीने दिलेल्या निरिक्षणांवर चर्चा करण्यासाठी बैठक आयोजित केली जाईल. या अहवालातून दोषी आढळल्यास शाळेच्या प्रशासनाला कारवाई करण्याबाबत निर्देश दिले जातील. गेल्या आठवड्यात बदलापूर येथील चार वर्षाच्या दोन मुलींवरील लैंगिक अत्याचार झाल्याची घटना घडली. या प्रकरणामुळे राज्यभरात तीव्र संताप व्यक्त करण्यात आला आहे. या घटनेचा निषेध करण्यासाठी आंदोलकांनी बदलापूर स्थानकावर रेल्वे वाहतूक १० तासांहून अधिक काळ रोखून धरली होती.

# स्वच्छतेच्या मुद्द्यावरून केडीएमसी आक्रमक

## अस्वच्छता आढळून आल्यास स्वच्छता निरीक्षकांना कारणे दाखवा नोटीस




**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : कल्याण डोंबिवली शहरातील स्वच्छता प्रश्नी घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त अतुल पाटील हे ॲक्शन मोडवर आल्याचे पाहायला मिळत असून प्रभागात अस्वच्छता आढळून आल्याने स्वच्छता निरीक्षकांसह सफाई कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. केडीएमसी आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांच्या निर्देशानुसार कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त अतुल पाटील यांच्यामार्फत महापालिकेच्या प्रभागक्षेत्र कार्यालय परिसरात प्रत्यक्ष भेट देऊन महानगरपालिका क्षेत्रातील घनकचरा व्यवस्थापन कार्यवाहीचा आढावा घेण्यात आला. या भेटी दरम्यान पान ४ वर ▶▶




## जनगणना आणि निवडणूक कामांतून

# शिक्षकांची सुटका नाहीच

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी**

सोलापूर : शिक्षण विभागाशी संबंध नाही किंवा विभागाकडे परंपरागतरित्या जी कामे शिक्षकांना सांगितली जातात, अथवा डाटा एन्ट्री जिचा शिक्षकांशी संबंध नाही, अशा कामांमधून शिक्षकांची आता सुटका करण्यात आली आहे.

मात्र, दशवार्षिक जनगणना, आपत्ती निवारणाची कामे आणि स्थानिक स्वराज्य संस्था, विधानसभा, लोकसभा निवडणुकांची कामे शिक्षकांना करावीच लागणार



आहेत. शालेय शिक्षण विभागाच्या नवीन निर्णयातून ते स्पष्ट करण्यात आले आहे.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील कलम २७ नुसार शिक्षकांना अशैक्षणिक कामांसाठी नियुक्त करण्यास मनाई करण्यात आली आहे. राज्यातील सर्व मुलांना गुणात्मक व दर्जेदार शिक्षण देण्यासाठी शिक्षण हक्क कायद्यानुसार वर्षातून प्राथमिक वर्गासाठी किमान २०० दिवस तर उच्च प्राथमिक वर्गांना किमान २२० दिवस अध्यापन होणे बंधनकारक आहे.

तरीदेखील शिक्षकांना अशैक्षणिक कामे दिली जातात व त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व सर्वांगिण विकासावर बाधक परिणाम होत असल्यासंदर्भात आमदारांनी अधिवेशनात भाष्य केले होते. त्यानंतर शासनाने शालेय शिक्षण विभागाच्या पान ४ वर ▶▶



दैनिक ठाणे
# जीवनदीप वार्ता
ठाणे | शनिवार
• २६ ऑगस्ट २०२४

## नवी मुंबईत पोक्सो अंतर्गत दोन दिवसांत चार गुन्हे



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई :** बदलापूर येथील घटना ताजी असताना नवी मुंबईतही विविध प्रकरणांत अल्पवयीन मुलीशी अश्लील चाळे, बलात्कार, विनयभंगप्रकरणी दोन दिवसांत चार गुन्ह्यांची नोंद झाली आहे. याप्रकरणी संबंधित पोलीस ठाण्यांत गुन्हा नोंद झाला असून पोलीस तपास करीत आहेत. संजय गायकवाड असे यातील आरोपीचे नाव आहे. एक दहावर्षीय विद्यार्थिनी तिच्या मैत्रिणीसोबत शैक्षणिक साहित्य खरेदीसाठी एका दुकानात गेली होती. शाळेत त्यांना प्रोजेक्ट बनवण्यासाठी कार्ड बोर्ड पेपर हवा होता. त्यासाठी त्या दोघी दुकानात गेल्या होत्या. यावेळी आरोपीने त्यांना अडवून शरीरावर विचित्र पद्धतीने स्पर्श केला. त्यामुळे दोघींच्या मनात लज्जा उत्पन्न झाली. याबाबत त्यांनी पालकांना सांगितल्यावर त्यांनी तात्काळ पोलीस ठाण्यात याबाबत तक्रार दिली. तक्रारीची दखल घेत पोलिसांनी ही आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्हा २० तारखेला नोंद झाला.

## मेडलच्या रुपात तिने साकारले स्वप्न

एक आहे मारिया आंद्रेत्जिक़. २५ वर्षांची पोलॅन्डची खेळाडू. भालाफेकमधे २०१६च्या रिओ ऑलम्पिकला तिचं पदक अवघ्या २ सेंटीमीटरने हुकलं. २०१८ उजाडला आणि कळलं की तिला हाडांचं कॅन्सर आहे. टोकियो ऑलम्पिकमधे सहभागी होण्याचं स्वप्न जवळपास संपुष्टात आलेलं.

सुदैवाने ऑपरेशन यशस्वी झालेत आणि मारिया परत फील्डवर आली. २०२०च्या समर ऑलम्पिकला सिल्वर मेडल पटकावलं आणि टोकियोचे दारही उघडलेत. टोकियोत तिने स्वतःचा रेकॉर्ड आणि पोलॅन्डचा राष्ट्रीय रेकॉर्ड तर मोडलाच; पण त्याच सोबत विश्वविक्रमाच्या यादीत आजतागायतची तिसरी सर्वोत्तम कामगिरी करत तिने सिल्वर मेडलही पटकावलं.

मारिया आंद्रेत्जिक़ जेव्हां टोकियोत ही कामगिरी करत होती, तेव्हां मायदेशी पोलॅन्डमधे एक लहान मुलाचे आईबाप हैराण होत होते.

त्यांच्या ८ महिन्याच्या मिलोस्ज़ेक मलिसाला हृदयाच्या एक खूप दुर्मिळ विकार आहे. ह्या मुलाच्या आजारावर उपचार एकच - हृदयावर शल्यक्रिया. पण हे विकार असं आहे की इतक्या लहान पोरावर ह्या विकाराची शल्यक्रिया करायला अक्ख्या पोलॅन्डमधे एकही शल्यचिकित्सक किंवा हॉस्पिटल तयार नव्हतं.

अनेक ठिकाणी नकार पचवल्यावर अमेरिकेत स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटी मेडिकल सेंटरला ह्या शल्यक्रियेची व्यवस्था असल्याचं कळलं. मात्र तिकडे संपर्क केल्यावर त्यात ३,८५,००० डॉलर म्हणजे भारतीय चलनात जवळपास ३ कोटी रुपयांचा खर्च ऐकून मिलोस्ज़ेकच्या आई बाबांच्या तोंडाचं पाणी पळालं.

मिलोस्ज़ेकच्या आई-वडिलांनी crowd funding साठी प्रयत्न केलेत पण त्यात निम्मे पैसेच एकत्र झालेत. crowd fundingच्या नियमांनुसार दिलेल्या कालावधीत पूर्ण रक्कम एकत्र होऊ शकली नाही, तर crowd funding फोरम दानदात्यांना त्यांचे पैसे परत करते. मिलोस्ज़ेकच्या आईवडिलांवरही ही वेळ येऊन ठेपली. कॅम्पेन संपायला अगदी मोजके दिवस उरले होते. त्यांनी आवश्यक अशी अर्धी रक्कम अजून एकत्र करण्यासाठी fund raiserच्या पोस्टवर हाक मारली - 'आमच्या मिलोस्ज़ेकला वाचवा.' मारियाने ही हाक ऐकली.

मारियाकडे एवढे पैसे तर नव्हते, पण तिच्याकडे दोन दुर्लभ गोष्टी होत्या. एक - मदत करण्याची अदम्य इच्छाशक्ती, आणि दुसरं - तिचं दहा बारा दिवसांपूर्वी जिंकलेलं ऑलम्पिकचं सिल्वर मेडल. तिने तडक ते मेडल मिलोस्ज़ेकच्या उपचारासाठी लिलावात काढलं.

हे मेडल नाही, तिचं स्वप्न होतं. जे स्वप्न २०१६ला हुकलं होतं, २०१८ला पूर्णपणे भंगच झालेलं, आणि २०२१मधे हे स्वप्न पाच वर्षांची मेहनत, साधना, तपश्चर्या, ध्यास लावून मेडलच्या रुपात तिने साकारलं होतं. अटीतटीच्या परिस्थितीत अनोळखी माणसांसाठी तेच तिने विकायला काढलं.

पोलॅन्डच्या एका सुपरमार्केट चेन झाबका पोल्स्काने हे मेडल विकत घेतलं सव्वा लाख डॉलर्समधे म्हणजे साधारण ९३ लाख रुपयांत, हे पैसे थेट फंड रेजर संस्थेकडे जमाही केलेत. पण झाबका पोल्स्काचे मालक इकडेच थांबले नाहीत. त्यांने मारियाच्या मदतीच्या भावनेला तोडीसतोड काम केलं. त्यांनी मारियाचा सिल्वर मेडल तिला परत दिला, आणि सांगितलं - परत कधी, कुणाचं जीव वाचवावेसे वाटल्यास




अश्या गोष्टी तुझ्याच हाताशी असाव्यात.

टोकियो ऑलम्पिकमधे ३५० इव्हेंट्स म्हणजे साधारण हजारभर पदक विजेता होते. आपल्या देशाला ७ पदक आलेत, म्हणून त्यांची नावं आपल्याला माहिती आहेत जेव्हां ७० पदक येतील तेव्हां नावं लक्षात राहणे कठीण होईल. पण मारिया आंद्रेत्जिक़सारखे खेळाडू खेळावर, रिकॉर्डबुक्समधे आपलं नाव लिहितातच, पण इतिहासावरही आपलं नाव कोरून ठेवतात. ते नाव विसरत नाहीत.

पूर्वीच्या काळात भाले हृदयात खुपसून प्राण घेतले जात असे. मारियाने भाला फेकून प्राण वाचवले, आणि मारियाच नाही तर झाबका पोल्स्कानेही हृदय जिंकले. ह्या घटना अश्या असतात, ज्या आपल्याला बदलायला भाग पाडतात, जगाकडे बघण्याचा नवीन दृष्टिकोन देतात, ज्या खेळांवर प्रेम करायला भाग पाडतात. ही मुलगी माझी लेक, किंवा लहान बहीण असती, तर खांद्यावर घेऊन नाचलो असतो. नाहीए, तरी हरकत नाही, माणूस म्हणून तिचा अभिमान आहेच... तिची माहिती लक्षात ठेवा,

**नाव - मारिया आंद्रेत्जिक़**
**देश - पोलॅन्ड**
**खेळ - जेवलीन थ्रो**
**पदक - सिल्वर**

## ७.५ हॉर्स पॉवर पर्यंत जोडभार असलेल्या
# शेतीपंपांना मोफत वीज

**राज्यातील ४४ लाख ३ हजार शेतीपंपांना मिळणार मोफत वीज**

**सरकार कडून १४,७६० कोटी रुपये अनुदानाची तरतूद**



'महाराष्ट्र सरकारने २५ जुलै २०२४ रोजी जाहीर केलेल्या शासन निर्णयानुसार ७.५ हॉर्स पॉवर पर्यंत जोडभार असलेल्या राज्यातील ४४ लाख ३ हजार शेतीपंप वीज ग्राहकांना मोफत वीज देण्यात येणार आहे. त्यासाठी राज्य सरकारने १४,७६० कोटी रुपये अनुदान देण्याची तरतूद केलेली आहे. हा निर्णय स्वागतार्ह आहे. तथापि तो केवळ 'निवडणूक जुमला वा रेवडी' असू नये, अशी रास्त आहे. अपेक्षा महाराष्ट्र वीज ग्राहक संघटनेचे अध्यक्ष प्रताप होगाडे यांनी व्यक्त केली आहे.

होगाडे यांनी नमूद केले आहे की, शेतकऱ्यांचा वीज वापर दुप्पट दाखविला जातो, हे सत्य आता जगजाहीर आहे. दुप्पट वापर दाखविण्याचा फायदा महावितरण कंपनीला आहे. प्रत्यक्षात ६० ते ६५ युनिटस द्यायची आणि दरमहा सरासरी १२५ युनिटस प्रति हॉर्सपॉवर प्रमाणे बिलिंग करायचे, त्यामुळे राज्य सरकारकडून १२५ युनिटसची सबसिडी दिली जाते. याचा अर्थ सरकारकडून दुप्पट सबसिडी लाटायची आणि प्रत्यक्ष दिलेल्या वीजेच्या किंमतीपेक्षा जास्त रक्कम सबसिडीमधून जमा करायची आणि पुन्हा शेतकऱ्यांच्या डोक्यावर दुप्पट बिलांचा व थकबाकीचा बोजा लादायचा, हा धंदा राजरोसपणे महावितरण कंपनी करते आहे.

कंपनी आपल्या फायद्यासाठी आणि गळती लपविण्यासाठी शेतकऱ्यांना बदनाम करते आहे आणि त्याचबरोबर राज्य सरकारची म्हणजे जनतेचीच लूट करते आहे. राज्यातील जनतेवर व सरकारवर चुकीचा आर्थिक बोजा पडू नये, यासाठी राज्य सरकारने खऱ्या वीज वापराच्या आधारे कंपनीला योग्य सबसिडी द्यावी' अशी मागणी महाराष्ट्र वीज ग्राहक संघटनेचे अध्यक्ष, समाजवादी पार्टीचे कार्याध्यक्ष व वीजतज्ञ प्रताप होगाडे यांनी मुख्यमंत्री, उर्जामंत्री व राज्य सरकारकडे जाहीर प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

राज्यातील ४४ लाख ३ हजार ग्राहकांचा एकूण जोडभार अंदाजे २२०.१५ लाख हॉर्स पॉवर इतका आहे. आयआयटी, मुंबई या राज्यातील सर्वमान्य व नामांकित संस्थेच्या इ. स. २०१६ च्या अहवाला प्रमाणे राज्यातील शेतकऱ्यांचा सरासरी प्रति हॉर्स पॉवर वीज वापर १०६४ तास म्हणजे जास्तीत जास्त ७९४ युनिटस इतका आहे. म्हणजेच एकूण वार्षिक वीज वापर जास्तीत जास्त १७४८० दशलक्ष युनिटस इतका होऊ शकतो. राज्य सरकारने मात्र ३९२४६ दशलक्ष युनिटस इतका वीज वापर दाखवलेला आहे. याचाच अर्थ शेतकऱ्यांचा वीज वापर सव्वादोन पट दाखविलेला आहे. वास्तविक पाहता शेतकऱ्यांचा वीज वापर एकूण वीज वापराच्या १५ℨ ते १६ℨ इतकाच आहे आणि वीज वितरण गळती ३०ℨ वा अधिक आहे. वीज वितरण गळती लपविण्यासाठी व कमी दाखवण्यासाठी शेतकऱ्यांचा वीज वापर ३०ℨ दाखवला जातो. त्यामुळे गळती लपवली जाते, गळती सध्या १३ℨ वा त्याहून कमी दाखवली जात आहे. कंपनी कार्यक्षम आहे, हे दाखवण्यासाठी सर्रास अशा पद्धतीने शेतकऱ्यांची लूट आणि बदनामी गेल्या बारा वर्षाहून अधिक काळ सुरू आहे.

इ. स. २०११-१२ मध्ये राज्यातील सर्व विनामीटर शेती पंप वीजग्राहकांचा जोडभार वाढवण्यात आला आहे. ३ हॉर्स पॉवर असलेल्या ग्राहकांचा जोडभार ५ हॉर्स पॉवर करण्यात आला. ५ होता त्यांचा ७.५ आणि ७.५ होता त्यांचा १० हॉर्स पॉवर करण्यात आला. मा. बावनकुळे ऊर्जामंत्री असताना या संबंधातील सर्व आकडेवारी वर्तमानपत्रातून आणि माहिती अधिकाराखाली प्राप्त झालेल्या पुराव्यानिशी जाहीर झालेली आहे. त्याच दरम्यान इ. स. २०११-१२ पासूनच राज्यातील मीटर असलेल्या सर्व शेतीपंप वीजग्राहकांचा वीज वापर वाढवून दाखवण्यास सुरुवात करण्यात आली. मीटर्स असलेल्या सर्व ग्राहकांचा वीज वापर सरासरी दरमहा प्रति हॉर्स पॉवर १२५ युनिटस म्हणजेच वार्षिक १५०० युनिटस म्हणजेच वार्षिक २००० तास दाखवण्यास सुरुवात करण्यात आली. आणि ही प्रथा सातत्याने अजूनही तशीच सुरू आहे.

चंद्रशेखर बावनकुळे ऊर्जामंत्री असताना 'शेती पंप वीज वापर सत्यशोधन समिती' ची स्थापना करण्यात आली. या समितीचा प्रत्यक्ष तपासणी व निष्कर्ष अहवाल आयआयटी मुंबई या सर्वमान्य व नामांकित संस्थेने तयार केलेला आहे. निष्कर्ष वर नमूद केला आहे. हा अहवाल तत्कालीन राज्य सरकारने पटलावर ठेवला नाही व आयोगाकडेही पाठविला नाही. उलट बासनात गुंडाळून टाकला. त्यामुळे आयोगाने स्वतःहून यासंदर्भात समिती नेमली. या समितीने राज्यातील शेतकऱ्यांचा वीज वापर महावितरण कंपनी दाखविते त्यापेक्षा कमी आहे हे राज्यातील ५०० शेती फीडर्स वरील तपासणीवरून सप्रमाण सिद्ध केले. आणि फीडर इनपुट आधारित बिलिंग करण्यात यावे अशा पद्धतीची शिफारस केली. या अहवालानंतर महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने सातत्याने महावितरण कंपनी दावा करते, त्यापेक्षा शेती पंपांचा वीज वापर कमी आहे असे आदेश दिलेले आहेत. सध्या हा वीजवापर वार्षिक १५०० युनिटसच्या ऐवजी १२५० युनिटस गृहीत धरून आयोग मान्यता देत आहे. त्यानुसार यावर्षीचा वीज वापर आयोगाने फक्त २७,७६८ दशलक्ष युनिटस इतकाच मान्य केलेला आहे. प्रत्यक्षात तो त्याहूनही निश्चित व निर्विवाद कमी आहे हे वास्तव आहेच. तथापि कंपनीने मात्र आयोगाच्या मान्यतेपेक्षा दीडपट वीज वापर सरकारसमोर दाखवलेला आहे आणि त्या आधारे अनुदान रकमेस मान्यता घेतलेली आहे.

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ शुगर केन रिसर्च, लखनौ या राष्ट्रीय पातळीवरील संस्थेने उसासाठी किती पाणी वापर केला जातो याचा अहवाल जाहीर केला आहे. त्यानुसार सर्वाधिक पाणी वापर महाराष्ट्रात एक किलो उसासाठी २९२ लिटर इतका होतो असे स्पष्ट केले आहे. हा वापर गृहीत धरला आणि राज्यातील शेतकऱ्यांचे सरासरी ऊस उत्पादन गृहीत धरले, तर त्यानुसार एक एकर उसासाठी जास्तीत जास्त एक हॉर्सपॉवर वीज पुरेशी असते आणि संपूर्ण वर्षात ९०० तास शेतीपंप चालवला, तरी तो पुरेसा असतो हे आकडेवारीनिशी निश्चित व स्पष्ट झालेलें आहे. उसाचा वीज वापर सर्वाधिक असतो. त्यामुळे राज्यातील सर्व शेतकऱ्यांचा एकत्रित सरासरी वीज वापर त्यापेक्षा कमी असलाच पाहिजे हे निश्चित आहे.

राज्यातील शाळांच्या प्रमाणेच शेतीपंपांची पटपडताळणी केली तर निश्चितच अनेक सत्य व धक्कादायक बाबी समोर येतील. पण हे टाळते जात आहे. दुसरा सोपा पर्याय आहे. राज्यातील बहुतेक सर्व ठिकाणी शेती फीडर्स वेगळे करण्यात आलेले आहेत. स्वतंत्र शेती फीडर्सवर प्रत्यक्षामध्ये फिडरला वीज किती दिली गेली, या फीडरवरील सर्व ग्राहकांचा एकूण जोडभार किती आहे, या आधारे प्रति हॉर्स पॉवर खरा वीज वापर किती आहे हे निश्चित करता येते. या पद्धतीने आयोगाच्या आदेशानुसार प्रथम इ. स. २०२१ पासून राज्यातील ५०० शेती फीडर्स चे बिलिंग फीडर इंडेक्स पद्धतीने होत आहे. आणि सध्या अंदाजे ११०० फीडर्सचे बिलिंग फिडर इंडेक्स पद्धतीने होत आहे असे सांगितले जात आहे. हा वापर दरमहा प्रति हॉर्स पॉवर १२५ युनिटस नाही तर अंदाजे दरमहा प्रति हॉर्सपॉवर ३०/४० युनिटसपासून ते ७०/८० युनिटस पर्यंतच आहे. याचाच अर्थ बिलिंग सरासरीने दुप्पट होत आहे हे स्पष्ट झालेले आहे.


हा सर्व तपशील आम्ही वेळोवेळी आयोग, मंत्री व अधिकारी यांना दिलेला आहे. मार्च २०१८ मध्ये विधान भवन येथे झालेल्या बैठकीत तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , उर्जामंत्री बावनकुळे, सहकार मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासह ५ ते ६ मंत्री, किमान ८ ते १० आमदार व एन. डी. पाटील यांच्यासह इरिगेशन फेडरेशनचे शिष्ठमंडळ यांच्या उपस्थितीत हा सर्व तपशील सांगितलेला आहे.

आज अखेर राज्य सरकारने याबाबत कांहीही केलेले नाही. महावितरण कंपनीला पाठीशी घालण्याचा आणि ते देतील ती आकडेवारी मान्य करण्याचा प्रघात सरकारने आजही चालू ठेवलेला आहे. अशा पद्धतीने बिलिंग झाल्यामुळे शेतकऱ्यांचा वीज वापर जास्त दिसतो. शेतकऱ्यांची थकबाकी दुप्पट होते आणि बिले न भरल्यामुळे दंड व्याजासह चौपट होते. महावितरण कंपनीला मात्र दुप्पट सबसिडी मिळते. यामधून शेतकऱ्यांची 'अतिरेकी पाणी व वीज वापरतात' म्हणून विनाकारण बदनामी होते आणि कंपनीला न दिलेल्या वीजेचीही सबसिडी मिळते. तसेच त्या प्रमाणात वितरण गळती लपविली जाते.

वितरण गळती लपविण्याचा धंदा चालू राहिला पाहिजे. वितरण गळतीच्या नावाखाली वीजेच्या चोऱ्या आणि भ्रष्टाचार चालूच राहिला पाहिजे' यासाठी महावितरण कंपनी आजही पूर्वीप्रमाणेच शेतीपंप वीज वापराचे दावे करत आहे आणि राज्य सरकार त्याच आकडेवारीला मान्यता देत आहे हे या शासन निर्णयामधून स्पष्ट दिसून येत आहे.

शेतकऱ्यांना मोफत वीज मिळेल पण या योजनेची खरी लाभार्थी महावितरण ठरणार आहे. कंपनीला मिळणारी सबसिडी रक्कम ही शेवटी राज्य सरकारच्या तिजोरीमधून म्हणजेच जनतेच्या खिशामधूनच जाणार आहे. या खऱ्या वितरण गळतीवर नियंत्रण आणण्यासाठी आवश्यक असणारा प्रामाणिकपणा, इच्छाशक्ती आणि कार्यक्षमता कंपनीकडे कधीच नव्हती. तथापि किमान राज्य सरकारने तरी ती दाखवावी असे आवाहन शेवटी प्रताप होगाडे यांनी केले आहे.

## जाधववाडीच्या महाराजाचा आगमन सोहळा....






**दै.ठाणे जीवनदीप वार्ता ☐ प्रतिनिधी**

**डोंबिवली :** श्री साईनाथ मित्र मंडळ डोंबिवलीचा मानाचा नवसाला पावणारा जाधववाडीचा महाराजा गणपती आगमन सोहळा गुरुवार २२ तारखेला रात्री आठ वाजण्याच्या सुमारास सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास पार पडला. मंडळाचे अध्यक्ष दिनेश जाधव यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी यावेळी अथक मेहनत घेतली. डोंबिवली पश्चिमेकडील द्वारका हॉटेल जवळ गणपती बाप्पाची भव्य मूर्ती येताच डोंबिवलीकरांनी आपल्या मोबाईल मध्ये गणरायाच्या मूर्तीचे फोटो काढले.गजानन ढोल - ताशा पथकाने वाद्य वाजवत श्री गणेशाचे स्वागत केले. नागरिकांनी गणपती बाप्पाचे दर्शन घेण्यासाठी गर्दी केली होती.

## प्रसाद चिकित्सा संस्थेकडून विद्यार्थ्यांना चपलांचे वाटप !



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**☐ प्रतिनिधी**

**झिडके-अंबाडी :** प्राथमिक शिक्षण मुले दररोज शाळेत जावीत हा मुख्य उद्देश डोळयासमोर ठेवून अनवाणी पायांनी फिरणाऱ्या शाळेतील गरीब व गरजू मुला-मलींना प्रसाद चिकित्सा धर्मदाय संस्था गणेशपूरी, ता.भिवंडी, ठाणे. या संस्थेकडून ३०६ शालेय विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाचे मोफत चपलांचे वाटप केल्याची माहिती प्रसाद चिकित्सा संस्थेचे कार्यकारी व्यवस्थापक मिलिंद नरगुंद यांनी वृत्त प्रतिनिधींना दिली.

प्रसाद संस्थेमार्फत ग्रामीण विकासाचे ध्येय ठेवून गेल्या ३० वर्षांपासून तानसा खोऱ्यातील आदिवासीं बहुल भागांमध्ये आरोग्य शिक्षण, पाणी, स्वच्छता, शेती व महिला सक्षमीकरण यावर अविरतपणे सदर संस्था काम करीत आहे.

मुले दररोज शाळेत यावीत,तसेच शाळा गळतीचे प्रमाण कमी व्हावे या उद्देशाने ५ जिल्हा परिषद शाळेतील मुलांना चपलांचे वाटप प्रकल्प गेल्या ३ वर्षांपासून संस्था राबवित आहे.आजपर्यंत सुमारे २००० विद्यार्थ्यांना याचा लाभ झाला आहे,असे संस्थेकडून वृत्त प्रतिनिधींना सांगण्यात आले.

## दैनिक राशिफल

**सोमवार २६ ऑगस्ट २०२४**

**मेष**
भावंडांशी असलेले आर्थिक वाद मिटवण्यासाठी चांगला आहे.कोणत्याही कामाचे कौतुक होईल. न्राशि फलादेश चांगला आहे. आज तुम्हाला काही कामासाठी सन्मान मिळेल.

**वृषभ**
योग्य विचार करून पुढे जा. आज आपण काही तणावात असाल ज्यामुळे आपण आपल्या जबाबदाऱ्यांकडे लक्ष देऊ शकणार नाही.

**मिथुन**
आपले मन मित्रांकडे केंद्रित राहील. बहुतेक वेळ त्यांना संदेश पाठविण्यात किंवा त्यांच्याशी फोनवर बोलण्यात घालवाल. काही काळ एखाद्या गोष्टीविषयी तणाव असू शकतो.

**कर्क**
आरोग्य चांगले राहील. आज तुमची काही अपूर्ण कामे पूर्ण कराल.दिवस चांगला जाईल. आज विद्यार्थ्यांना अभ्यासात रस राहील. तुमच्या आर्थिक परिस्थितीनुसारच खर्च करा.

**सिंह**
मागील गैरसमज दूर करुन संबंध दृढ करा. घर खरेदी करण्याचा निर्णय घेऊ शकता. घर खरेदीचा विचार करत आहात आता ती वेळ आली आहे.

**कन्या**
धार्मिक कार्यात आपली रुची वाढेल आणि आपण धार्मिक स्थळांवर फिराल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा क्षेत्रात मंदी आणि उपलब्धतेचा अभाव असेल. नातेवाईक घरास भेट देतील.

**तुळ**
ऑफिसमध्ये आज तुम्हाला नवीन प्रोजेक्ट मिळू शकतो. दिवस शुभ आहे पण तुम्हाला तुमच्या आरोग्याची देखील काळजी घेणे आवश्यक आहे. कुटुंबासोबत आनंददायी वेळ घालवाल.

**वृश्चिक**
सभोवतालचे लोक कदाचित तुमच्याबद्दल गैरसमज बाळगू शकतात, म्हणून आपले विचार स्पष्टपणे व्यक्त करा. विचारपूर्वक बोला; गैरसमज झाला तर त्रास होईल.

**धनु**
सामंजस्यामुळे घरात आनंदी वातावरण असेल. परस्पर विचारांची देवाण घेवाण होईल. नित्यकर्मांमधून थोडा बदल घडवून आणू शकते. मुलांवर नियंत्रण न ठेवता, त्यांना स्वातंत्र्य देखील द्या.

**मकर**
फॅशन डिझायनर्सना काही ग्राहकांकडून चांगला नफा मिळेल. दिवस चांगला जाईल.व्यावसायिक चांगले काम करतील आणि त्यांचे उत्पन्न वाढेल. आज ज्येष्ठांसोबत वेळ घालवा

**कुंभ**
जवळच्या नातेवाईक किंवा मित्राशी मतभेद असू शकतात. कोणावरही विश्?वास ठेवू नका. अभ्यासाकडे लक्ष न देता फिरण्यात वेळ वाया घालवू नये.

**मीन**
आपल्या अहंकार आणि रागामुळे वातावरण थोडे गडबड होऊ शकते, हे लक्षात ठेवा. आयुष्यातील जोडीदाराशी संबंध सौहार्दपूर्ण असेल. प्रेम संबंधांमध्ये कटुता येऊ शकते.

# मुरबाड तालुका कुणबी समाजोन्नती मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न



❍ दै.ठाणे जीवनदीप वार्ता ❍

**मुरबाड :** मुरबाड तालुका कुणबी समाजोन्नती मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा दि.२५ ऑगस्ट २०२४ रोजी कुणबी भवन मुरबाड येथे कुणबी समाजाचे लोकनेते माजी आमदार गोटिराम पवार यांच्या अध्यक्षतेखाली संप्पन्न झाली. तालुक्याचे भाग्यविधाते माजी महसूल मंत्री स्व.शांताराम भाऊ घोलप यांनी १९६७ साली या समाज मंडळाची स्थापना केली होती. सुरुवातीला मुरबाड शहर व मुरबाड तालुका अशा दोन संघटना होत्या नंतर पुढे यांचे एकत्रि करण केले गेले .

या सभेचे प्रास्ताविक संघटनेचे अध्यक्ष शांताराम बांगर यांनी केले. तर मागिल सभेचे इतिवृत्त सहचिटणीस मधुकर मोहपे यांनी वाचुन दाखविले .तर मागिल खर्चा चा व पुढिल २०२४-२५ चा अंदाज पत्रक सरचिटणीस प्रकाश पवार यांनी सभेपुढे ठेवले . तर अध्यक्ष गोटिराम पवार साहेब यांनी सभासदांच्या सुचना व हरकती मांडण्याची परवानगी दिली. त्याच बरोबर नविन कार्यकारिणी निवडण्यासाठी उपस्थित सभासदांपैकी ५१ नावे मागविण्यात आली असुन लवकरच नविन कार्यकारिणी जाहिर होणार आहे. यावेळी मार्गदर्शन करताना पवार साहेबांनी कार्यकारिणीत महिलांचा समावेश करणे तसेच जे सदस्य सलग तीन वेळा मासिक सभेला गैरहजर राहिल्यास त्यांना कार्यकारिणी तून वगळण्यात येईल अशा महत्वाच्या सूचना केल्या व नविन सदस्यांना शुभेच्या दिल्या. या सभेसाठी जि.प.माजी उपाध्यक्ष सुभाष पवार, माजी अध्यक्ष गणपत विशे, सुभाष घरत , उल्हास बांगर, रामभाऊ दळवी, आप्पा घुडे, आत्माराम सासे, सुवर्णा ठाकरे, अनिता कथोरे, भारती पष्टे , चेतना ठाकरे यांच्या सह मोठ्या संख्येने समाज बांधव उपस्थित होते. तर या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन योगेंद्र बांगर व भालचंद्र गोडांबे यांनी केले.

# गोकुळाष्टमीला सिडकोच्या ९०२ सदनिकांची सोडत

म्हाडा MHADA

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**पनवेल :** सिडको महामंडळ नवी मुंबईतील विविध रेल्वे स्थानकांलगत महागृहनिर्माणातून हजारो सदनिका बांधत असल्याने या घरांची सोडत सिडको कधी काढणार याकडे सर्वसामान्यांचे लक्ष लागले असताना सिडको मंडळाने मंगळवारी रात्री कळंबोली, खारघर आणि घणसोली येथे यापूर्वी बांधलेल्या गृहसंकुलामध्ये बांधून पूर्ण असलेल्या उपलब्ध ९०२ सदनिकांची गृहविक्रीची सोडत कृष्ण जन्माष्टमीच्या मुहूर्तावर (२७ ऑगस्ट) काढणार असल्याचे जाहीर केले. या सोडतीमध्ये नवी मुंबईतील कळंबोली, खारघर व घणसोली या विकसित नोडमधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता ३८ व सर्वसाधारण प्रवर्गाकरिता १७५ असे २१३ सदनिका आणि खारघर येथे सिडकोने बांधलेल्या स्वप्नपूर्ती व वास्तूविहार-सेलिब्रेशन गृहसंकुलांतील ६८९ सदनिकांच्या विक्रीकरिता सोडत होणार असल्याची माहिती सिडकोने दिली. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचा पहिला टप्पा पुढील सात महिन्यांत सुरू होत असून नवी मुंबई मेट्रो, अटल सेतू महामार्ग हे सुरू झाल्याने सिडको परिसराला दळणवळणाची नवी गती मिळाली आहे.

# विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी श्रीनगर पोलीस स्टेशन सतर्क

## प्राचार्य, मुख्याध्यापक व शिक्षकांना केले मार्गदर्शन



❍ दै.ठाणे जीवनदीप वार्ता ❍

**ठाणे :** नुकत्याच घडलेल्या बदलापूर येथील शाळेतील लहान मुलीवर झालेल्या लैंगीक अत्याचाराचे पडसाद संपूर्ण महाराष्ट्र उमटलेले आहेत. असे प्रकार पुन्हा शाळांमध्ये घडू नये म्हणून वागळे विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त हेमंत शिंदे व श्रीनगर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील का. झावरे यांचे मार्गदर्शनाखाली शाळा कॉलेजमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजनांबाबत चर्चा करण्यासाठी श्रीनगर पोलीस स्टेशनचे हद्दीतील शाळा, कॉलेजचे प्राचार्य, मुख्याध्यापक व शिक्षक यांची श्रीनगर पोलीस स्टेशन, ठाणे येथे दिनांक २३ सप्टेंबर २०२४ रोजी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ३२ शाळांमधील प्राचार्य, मुख्याध्यापक व शिक्षक यांना मार्गदर्शन करण्यात आले.

या बैठकीत शाळा, कॉलेज व परिसरात तसेच ज्या ठिकाणावरून विद्यार्थ्यांची ये जा केली जाते त्या परिसरात उच्च प्रतीचे सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात यावेत. व त्यांची नियमीत देखभाल करण्यात यावी. शाळेतील शिक्षकेत्तर कर्मचा-यांची नियुक्ती करतांना त्यांची चारित्र पडताळणी करूनच नेमणुक करावी. तसेच त्यांची तपशिलवार माहिती छायाचित्रासह पोलीस स्टेशनला जमा करावी, शाळांमध्ये बाहयस्त्रोताद्वारे अथवा कंत्राटी पध्दतीने शिक्षकेत्तर कर्मचारी नियुक्त करतांना सहा वर्षापर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी शासनाचे नियमाप्रमाणे प्राधान्याने महिला कर्मचा-याची नियुक्ती करावी. शाळेमध्ये तक्रार पेटी बसविण्यात यावी. ही तक्रार बॉक्स तसेच सरकारने चालू केलेले ?प यावर माहिती द्यावी. सखी सावित्री समिती बाबत शासनाचे परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. त्यासाठी श्रीनगर पोलीस स्टेशनकडून महिला पोलीस अधिकारी व अंमलदार यांची नेमणूक करण्यात आली आहे. या व इतर सुचना देण्यात आल्या. यावेळी श्रीनगर पोलीस स्टेशन हद्दीतील शाळा कॉलेजचे प्राचार्य, मुख्यध्यापक, शिक्षक व शाळेचे सदस्य उपस्थित होते. असे श्रीनगर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील का. झावरे यांनी सांगितले.

# मूल्यशिक्षण सक्तीचं करा

## शिक्षण शक्ती संघटनेची मागणी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** शाळांमध्ये घडणाऱ्या अनैतिक घटना रोज वर्तमानपत्रात प्रसिद्ध होत आहेत. या घटना थांबवण्यासाठी शासन सक्षम सक्षम पावले उचलत आहे. परंतु हे अनैतिक आणि असभ्य वर्तन संपवण्यासाठी शाळेतही निरोगी वातावरण निर्माण करणे गरजेचे आहे. काही वर्षापूर्वी शासनाचे वतीने मूल्यशिक्षण या विषयावर प्रशिक्षण दिले गेले परंतु ते लागू केले गेले नाही.

सध्याचे सामाजिक बदलामध्ये मुलांवर संस्कार करण्याची गरज आहे. त्यामुळे इयत्ता १ली ते १० वी पर्यंत मूल्यशिक्षण हा विषय बंधनकारक करून सर्व कर्मचाऱ्यांना याचे प्रशिक्षण द्यावे. आणि आनंददायी शनिवारी राबवल्या जाणाऱ्या उपक्रमामध्ये या विषयासाठीचे विशेष नियोजन करावे. तसेच प्रत्येक शाळेमध्ये एका महिला शिपायाची नेमणूक करण्याचा प्रयत्न करावा. अशा मागणी शिक्षण शक्ती संघटनेचे राज्य अध्यक्ष कुँवर राकेश राजाबेटी गंभीर सिंह तोमर यांनी मुख्यमंत्री व शिक्षणमंत्री यांना पत्राद्वारे केली आहे.

# दिव्यात बेशिस्त रिक्षा चालक, संघटना व वाहतूक पोलिसांचे दुर्लक्ष

## ठाणे (दिवा )वाहतूक पोलीस विभाग स्वतंत्र करून अधिकृत आरटीओ भाडे दर आकरावे - प्रवाशांची मागणी



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**□ प्रतिनिधी**

**ठाणे :** दिवा येथील रिक्षा चालकांमुळे वाहतुक कोंडीत भर पडत असताना स्टेशन परिसरातील बेशिस्त रिक्षाचालक नियमानुसार तीन प्रवासी घेऊन न जात चौथ्या सीट वर देखील रिक्षाचालक प्रवासी घेऊन जात असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. त्यांच्यावर वाहतुक किंवा आरटीओकडून कारवाई केली जात नसल्याच निदर्शनास आले आहे तसेच संघटनेने देखील बेकायदेशीर भाडेवाढ करून प्रवासियाना मेटाकुटीला आणले आहे.रिक्षा चालकांच्या बेशिस्तीमुळे येथे अपघात होण्याची शक्यता देखील नाकारता येत नसल्याचे काही ज्येष्ठ समाज बांधवांनी बोलताना सांगितले. यावर तत्काळ उपाय योजना करुन रिक्षा चालकांना शिस्त लावावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

स्टेशन परिसरात सकाळ आणि सायंकाळच्या सुमारास बेशिस्त रिक्षा चालक आपल्या रिक्षा कुठेही कशाही उभ्या करत असून त्यामुळे वाहतुक कोंडीत भर पडत असल्याचे चित्र दररोज दिसत आहे.स्टेशन परिसरात थांबा दिला असतांनाही दिवा टर्निंग येथे रस्त्याच्या मधोमध अस्ताव्यस्त रिक्षा लागत असल्याचे दिसून येत आहे. त्यात अलिकडे असलेल्या येणाऱ्या बसेस व इतर वाहनांना विरुध्द दिशेने जात असताना मोठी वाहतूक कोंडी हमखास होते.

दुसरीकडे येथून रिक्षा पकडणारे प्रवासी हे सकाळ संध्याकाळ दिवा स्टेशन येथून रिक्षा पकडत असून अनेक रिक्षा चालक जवळचे भाडे नाकारून लांब पल्याचे भाडे घेऊन अनियमित चार प्रवासी भरत आहेत हे रात्री अकरा च्या सुमारास सुरूच असते यावेळी क्रीत्येक वेळा प्रवासी व चालक यांच्यात वाद झालेला पहायला मिळत असल्याने अद्याप याकडे संघटना व वाहतूक पोलिसांचे दुर्लक्ष आहे.

# बीएमग्रुपच्या वतीने सत्यनारायण महापूजा व शिव भंडाराचे आयोजन

## भीमाशंकर पदयात्रेला सग सहा वर्षे पूर्ण




**दै.ठाणे जीवनदीप वार्ता :**

**ठाणे** -दिवा शहरात यंदा भीमा शंकर पदयात्रेला सहा वर्षे पूर्ण झाली त्यानिमित्ताने बी एम ग्रुप च्या वतीने सत्यनारायण महापूजा व भव्य शिव भंडारा आयोजित करण्यात आला होता.यावेळी माऊली हरिपाठ व गायिका ह. प.भ सौ शशिकला म्हात्रे यांचे सुश्राव्य कीर्तन आणि आख्यान यावेळी झाले तसेच सायंकाळी गावदेवी भजंन मंडळाचे (बेतवडे )भजन संपन्न झाले.तसेच युट्यूब फेमस कलाकारांची मदियाळी देखील यावेळी उपस्थित होते.

आयोजक बिंदास म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली सल्लग दोन दिवस पदयात्रा करून न थांबता न थकता भगवान शंकराचे दर्शन घेऊन पुन्हा मार्गस्थ होतो या पदयात्रेत मंडळाचे पदाधिकारी मोठया उत्साहात सहभागी होतात व याच निमित्ताने सत्यनारायण महापूजा व शिव भंडारा मोठया उत्साहात साजरा केला जातो तसेच अनेक दानशूर व देणगीदार देखील पुढे येत असतात या सर्वांचे आभार मानतो असे मंडलाचे सर्वसर्वी बिंदास म्हात्रे यांनी यावेळी बोलताना स्पष्ट केले

प्रसंगी विलास पाटील, प्रकाश शेलार सिद्धेश मेस्त्री,ओमकार चव्हाण आदी पदाधिकारी व कार्यकर्ते अथक परिश्रम घेत उपक्रम यशस्वी केला.

# भाऊसाहेब नेने महाविद्यालयात स्मृती व्याख्यानमाला संपन्न!




**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**□ प्रतिनिधी**

**पेण :** पेण एज्युकेशन सोसायटी च्या भाऊसाहेब नेने महाविद्यालयात ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक आणि थोर समाजसेवक स्वर्गीय भाऊसाहेब नेने यांच्या स्मृती दिनाचे औचित्य साधून प्रसिद्ध उद्योजक राजेश मंडलिक यांच्या 'शिक्षण आणि उद्योग व्यवसाय' या विषयावरील विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यक्रमासाठी संस्थेचे आधारस्तंभ ॲड. बापुसाहेब नेने, संस्थेचे अध्यक्ष ॲड मंगेश नेने, संस्थेचे अन्य पदाधिकारी, प्राचार्य डॉ.सदानंद धारप, सांस्कृतिक विभागाचे सर्व सदस्य,विविध शाखांचे प्राध्यापक, विविध वृत्तपत्रांचे पत्रकार, पेण आणि परिसरातील नागरिक तसेच विद्यार्थीवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

दीपप्रज्वलन आणि मान्यवरांच्या स्वागताने कार्यक्रमाची सुरूवात झाली.

यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदानंद धारप यांनी आपल्या प्रास्ताविकात सदर स्मृती व्याख्यानमालेला १४ वर्षांची दीर्घ परंपरा असल्याचे सांगुन या निमित्ताने चाकोरीबाहेर जाऊन स्वतःचं वेगळं अस्तित्व निर्माण करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींना आमंत्रित करून त्या माध्यमातून विद्यार्थी , त्यांचे पालक आणि उपस्थित श्रोत्यांमध्ये विचार मंथन होऊन शिक्षणाच्या वेगळया पैलूंचा त्यांना परिचय व्हावा आणि विद्यार्थ्यांमधील कार्यकर्तृत्वाला सुयोग्य दिशा मिळावी ,त्यांच्यातील सकारात्मकता वाढीस लागावी,हा सदर व्याख्यानमालेचा उद्देश असल्याचे सांगितले.

यानंतर प्रमुख वक्ते आणि प्रसिद्ध उद्योजक राजेश मंडलिक यांनी विद्यार्थ्यांसोबत सुसंवाद साधत साध्या नोकरीपासून उद्योजक होण्यापर्यंतचा आपला प्रवास त्यातील खाचखळग्यांसह विद्यार्थ्यांना उलगडून दाखविला.कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी चिकाटी, निर्णय व नियोजन क्षमता आणि संवाद कौशल्याचे असणारे महत्त्व विशद करत मंडलिक यांनी हे सर्व गुण स्वतःमध्ये आत्मसात करून आपल्या ध्येय प्राप्तीसाठी अविरत प्रयत्न करण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले. तर संस्थेचे अध्यक्ष ॲड मंगेश नेने यांनी अध्यक्षीय मनोगतात विद्यार्थ्यांमधे उद्योजकीय कौशल्ये विकसित व्हावीत यासाठी शिक्षण आणि व्यावसायिक अभ्यासक्रम यांचा मेळ साधला जाणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले. यानंतर प्रमुख वक्ते श्री. मंडलिक यांनी श्रोतृवर्गाच्या शंकांचे समाधान केले आणि कार्यक्रमाची सांगता झाली. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.पी.डी.पाटील यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. डी. के. बामणे यांनी केले.

# वरसई शाळेच्या मुलींनी खो-खो सामन्यात तालुक्यात मारली बाजी



**दै.ठाणे जीवनदी वार्ता**

**पेण :** प्रायव्हेट हायस्कूल पेणच्या मैदानात तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा पार पडल्या त्यात कै.पु.न.गोडसे विद्या मंदिर वरसई शाळेतील १७वयोगटातील मुलींचा खो-खो सामना सेमी फायनल मध्ये सौ .म .ना. नेने कन्या विद्यालयाचा ४/७असा पराभव करत विजय मिळवून अंतिम फेरीत धडक मारली व अंतिम सामन्यांमध्ये एस .एम .पाटील माध्यमिक विद्यालय वरवणे विद्यालयातील मुलींचा जवळपास ४/६असा पराभव करत ४मिनिटे वेळ राखत अंतिम सामना विजेतेपद पटकावत प्रथम क्रमांक प्राप्त केले.सहाय्यक शिक्षक आर.एम. चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच वरसई पंचक्रोशीतील शाळेचे माजी विद्यार्थी राणी कदम ,रोहन सोनगरे, नितीन मोरे, निलेश पाटील ,प्रफुल्ल शिकवण ,समीर व सुशील काईनकर सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी योग्य मार्गदर्शन केले तसेच प्रशालेचे प्रभारी मुख्याध्यापक प्रवीण काळे यांनी सर्वतोपरी सहकार्य केले.

## बालकांनी चाईल्ड हेल्पलाईनचा लाभ घ्यावा

**पेण :** आपल्या आजूबाजूला आपल्याला जर बालकामगार, बाल भिक्षेकरी, लैंगिक अत्याचारग्रस्त बालके, हरवलेली बालके तसेच सापडलेली बालके, मदतीची आवश्यकता असलेली संकटग्रस्त बालके आढळल्यास अशा बालकांना त्वरित आवश्यक मदत कोठून व कशी मिळवून देता येईल, याकरिता कोठे संपर्क करावा यासाठी बालकांसाठी चाईल्ड हेल्पलाईन सेवा १०९८ संपूर्ण महाराष्ट्रात कार्यान्वित करण्यात आला असल्याची माहिती आयुक्त, महिला व बाल विकास डॉ.प्रशांत नारनवरे यांनी दिली आहे.

## बांगलादेशातील हिंदूंवरील अन्यायाविरोधात

# पेण मध्ये हिंदू संघटनांची निषेध फेरी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण (प्रतिनिधी) :** बांगलादेशातील हिंदू बांधवांवर अत?याचार होत आहेत. त्याचा निषेध करण्यासाठी आज पेण मध्ये हिंदू संघटनांच्यावतीने निषेध फेरी काढण्यात आली. शहरातील कोतवाल चौक ते बाजारपेठ मार्गे प्रांत कार्यालय पर्यंत घोषणा देत संपूर्ण पेण शहरातून फेरी काढण्यात आली. निषेध रॅलीमध्ये शेकडोच्या संख्येने हिंदू बांधव उपस्थित राहून बांगलादेशात हिंदूवर होणाऱ्या अत्याचाराचा निषेध केला.निषेध फेरीमध्ये शहरातील हिंदू बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या फेरीवेळी 'बांगलादेशी घुसखोरांना देशातून हाकला', 'हिंदूवरील अत?याचार सहन करणार नाही' अशा घोषणा देण्यात आल?या. यावेळी पेण शहरात आणि नाक्यांवर चोख पोलिस बंदोबस्त तैनात केला होता. तसेच निषेध फेरीवेळी पोलिस निरीक्षक संदीप बागुल, यांच्यासह मोठ्या संख्येने पोलिसांचा ताफा सज्ज होता. या निषेध फेरीमध्ये मंगल पाटील, ?ड गणेश म्हात्रे , भास्कर पाटील, भोपातराव महाराज, महेश पाटील, दिनेश पाटील, चंद्रकांत पाटील, अरुण भोईर.आदींसह हिंदू समाज मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी प्रांत कार्यालय अधिकारी यांना बांगलादेशातील होत असलेल्या अन्यायाबद्दल निवेदन सादर करण्यात आले.

# शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षा उपाय योजनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करा

## - तहसीलदार अभिजीत देशमुख यांचे आदेश !

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**मुरबाड □ प्रतिनिधी**

मुरबाड तालुक्यातील सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षा विषयक उपाय योजनांची काटेकोरपणे अमंलबजावणी करावी असे लेखी आदेश मुरबाड तहसीलदार अभिजीत देशमुख यांनी काढल्याने पालक वर्गात समाधान व्यक्त केले जात आहे.

बदलापूर शहरात घडलेल्या घटनेमुळे मुरबाड तालुक्यातही पालकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाल्याचे दिसून येत आहे. तालुक्यात १० ते १५ ईंग्रजी माध्यमाच्या खाजगी शाळा आहेत. या शाळेत तालुक्यातील चिमुकले विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. अनेक शाळेच्या विद्यार्थ्यांना ने- आण करण्यासाठी स्कूल बसची व्यवस्था आहे. या बसमधून ये - जा करणा-या मुलांवर लक्ष ठेवण्यासाठी पुरूष कर्मचा-यांची नेमणूक केल्याचे दिसुन येत आहे. मात्र बदलापूरची ह्दय पिळवटून टाकणारी घटना घडल्याने आता मुरबाड तालुक्यातील पालकही भितीच्या वातावरणात वावरताना दिसून येत आहे.बदलापूर येथे घडलेल्या घटनेची दखल घेत मुरबाड तालुक्यातील सर्व शाळांना तहसीलदार अभिजित देशमुख यांनी लेखी आदेश काढून सुरक्षा विषयक उपाययोजनाची काटेकोरपणे अंबलबजावणी करण्याचे आदेश लेखी पत्राद्वारे दिले आहेत .यामध्ये शाळा व परिसरात सी.सी. टिव्ही कँमेरे बसविण्यात यावेत,शाळेतील महिला शौचालय ठिकाणी महिला कर्मचाऱ्याची नेमणूक करण्यात यावी,विद्यार्थ्यांच्या स्कुलबस प्रवासासाठी सोबत महिला कर्मचा-याची नेमणूक करावी ,शाळेच्या आवारात तक्रार पेटी ठेवण्यात यावी,शाळेत कोणतेही अनूचित प्रकार घडल्यास गट शिक्षण अधिकारी यांना तात्काळ कळविण्यात यावेत.सखी सावित्री समितीबाबतच्या तरतुदीचे पालन करावे,विद्यार्थी सुरक्षा समितीचे गठन करावे .असे लेखी पत्रकात नमूद केले आहे. प्रत्येक शाळांनी वरील आदेशाची काय अंमलबजावणी केली आहे याचा अहवाल तहसीलदार कार्यालयात द्यावा असेही या आदेशात नमूद करण्यात आले आहे. अनेक विद्यार्थी खाजगी वाहानातून शाळेत ये -जा करत असल्याचे दिसून येत आहे. या विद्यार्थ्यांच्या सुरक्षतेची हमी कोण घेणार असाही प्रश्न पालकांना भेडसावत आहे.विद्यार्थी ये-जा करणा-या वाहनाची पडताळणी ,वाहानाच्या क्षमते प्रमाणे वाहानात विद्यार्थी घेतले जातात कि विद्यार्थी कोंबून नेले जातात याचीही पडताळणी पोलीस खात्याने करावी अशीहि मागणी होत आहे.

## जाहिर नोटीस

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, मुरबाड यांचे कार्यालय, मुरबाड**

**प्रति,**
**१) श्री. नंदकुमार मुकुंद भांडे,**
**राहणार रा. खोपिवली,**
**ता. मुरबाड, जि. ठाणे .............................. अर्जदार**
**विरुद्ध**
**२) ग्रामपंचायत खोपिवली,**
**जन्म मृत्यु नोंदणी विभाग,**
**ता. मुरबाड, जि. ठाणे .............................. सामनेवाले**

तमाम जनतेस सदर नोटीसीद्वारे सुचीत करण्यात येते आहे ते येणे प्रमाणे :-

१) उपरोक्त अर्जदार यांचे आजी कै. अनुसया वामन भांडे यांचा मृत्यु दिनांक १४/०३/२००९ रोजी राहत्या घरी मु. खोपिवली, ता. मुरबाड, जि. ठाणे येथे झालेला आहे. अर्जदाराकडून काही अपरिहार्य कारणांमुळे तसेच अनावधनामुळे सदर मृत्युची नोंद निबंधक, जन्म, मृत्यु नोंदणी विभाग, ता. मुरबाड, जि. ठाणे दप्तरी करुन मृत्युचा दाखला प्राप्त करुन घ्यावयाचा राहिला होता. अर्जदार यांना त्यांच्या काही वैयक्तिक कारणांसाठी जन्म/मृत्यु दाखल्याची आवश्यकता आहे.

२) उशीरा मृत्युची नोंदणी दाखला मिळणेसाठी मा. तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचेकडून आदेश प्राप्त करून घ्यावयाचा असल्यामुळे सदर कार्यालयास किरकोळ अर्ज क्र. ५३० दाखल केला आहे.

३) सदर बाबत कोणत्याही व्यक्तीची कोणताही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत सदर न्यायालयात दाखल करावी. वरील मुदतीत कोणीही योग्य हरकत न दाखल केल्यास अर्जदार यांना सदर कार्यालयातर्फे त्यांच्या आजीचा मृत्युच्या नोंदणीचा दाखला मिळणे करीता आदेश करण्यात येईल.

**आज दिनांक माहे १९/०८/२०२४ रोजी माझे सहीने व शिक्क्याने दिले.**

तहसिल कार्यालयाचा शिक्का

**हुकमावरुन**
**सही/-**
**(श्रीम. सुषमा अव्हाड-बांगर)**
**निवासी नायब तहसिलदार**
**तथा कार्यकारी दंडाधिकारी, मुरबाड**

**जा.क्र. - फौजदारी/जन्म मृत्यु नोंद/कावि-२५५/२०२४**

## शिक्षकांची सुटका नाहीच...

पान १ वरून ▶▶ प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून त्याचा अभ्यास केला. या समितीचा अहवाल शासनाला सादर झाला आणि त्यात शैक्षणिक व अशैक्षणिक कामे कोणती, याची स्पष्टताही केली आहे.

### शासन निर्णयातील ठळक बाबी...

अशैक्षणिक कामे म्हणजे ज्याचा शिक्षण विभागाशी संबंध नाही किंवा अन्य विभागाकडे परंपरागतरित्या जी कामे शिक्षकांना सांगितली जातात किंवा डाटा एन्ट्रीसह अन्य साधने वापरून जी कामे पूर्ण केली जातात, अशा प्रकारच्या कामांना अशैक्षणिक कामे समजण्यात यावीत.

ज्या बाबींचा शिक्षणाशी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संबंध आहे, अशा सर्व बाबी शैक्षणिक बाबी समजण्यात याव्यात.

शासनाच्या कोणत्याही विभागाकडून अशैक्षणिक कामे शिक्षकांना बंधनकारक करण्यात येऊ नयेत.

बालकांचा मोफत व शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९मधील कलम २७मधील परिशिष्ट-क येथे नमूद केलेली दशवार्षिक जनगणना, आपत्ती निवारणाची कामे व स्थानिक स्वराज्य संस्था, राज्य विधीमंडळ व संसदेसाठी होणाऱ्या निवडणुकांची कामे शैक्षणिक कामाशिवाय येणारी कामे शिक्षकांसाठी अनिवार्य राहतील.

### शिक्षकांना नकोय इलेक्शन ड्युटी

आता यावर्षी लोकसभा निवडणूक झाली, दीड-दोन महिन्यात विधानसभा निवडणूक होईल आणि त्यानंतर अवघ्या काही दिवसांतच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आहेत. त्यामुळे वर्षातील बरेच दिवस निवडणूक ड्युटीतच जातील, अशी नेहमीच स्थिती असते. त्यामुळे अध्यापनाशिवाय कोणतीही कामे नको, अशी शिक्षकांची प्रमुख मागणी होती. वर्षानुवर्षे राज्यभरातून तशीच मागणी होत होती.

घरोघरी जावून सर्व्हे, जनगनणना, बीएलओ, निवडणूक ड्युटी अशी कामे प्रामुख्याने शिक्षकांना नको आहेत. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी व सर्वांगिण विकासासाठी केवळ अध्यापनाचेच काम करता यावे, असा त्यामागील हेतू आहे.

## दहीहंडीचा साऊंड...

पान १ वरून ▶▶ शहरात दहीहंडी उत्सव साध्या पद्धतीने साजरा देखील होईल. मात्र त्या आधीच बदलापूर साऊंड असोसिएशनने एक निर्णय जाहीर करत त्याचे बॅनर सगळीकडे लावले आहेत. एक साऊंड व्यावसायिक म्हणून दहीहंडीची घेतलेली सर्व कामे त्यांनी रद्द केली आहेत. घटनेचे गांभीर्य आणि सामाजिक भान जपत असोसिएशनने घेतलेल्या या निर्णयाचे नागरिक कौतुक करत आहेत. स्टेशन परिसरात लागलेले बॅनर सर्वच उत्सुकतेने वाचत असून यास आम्ही देखील सहमत आहोत अशी भावना व्यक्त करत आहेत.

### काय आहे लिहलंय बॅनरवर

**नमस्कार बदलापूरकर... दर वर्षी आपण दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करतो. मात्र आपल्या बदलापूर मध्ये १३ तारखेला लहान चिमुकल्या मुलींच्या बाबतीत जे कृत्य घडले ते एकदम चुकीचे झाले आहे. हृदय पिळवटून टाकणारी ही घटना आहे. एक साऊंड व्यावसायिक म्हणून आम्ही दहीहंडीची घेतलेली सर्व कामे रद्द करत आहोत.**

**- बदलापूर साऊंड असोसिएशन**

## सरकारी कर्मचाऱ्यांना....

पान १ वरून ▶▶ महावितरण कंपनीस कर्जाकरिता शासन हमी

- पर्यायी खडकवासला फुरसुंगी बोगदा काढणार.
- पुणे परिसरास सिंचन, पिण्यासाठी अधिक पाणी उपलब्ध होणार
- नार-पार-गिरणा नदी जोड प्रकल्प. ७ हजार १५ कोटीस मान्यता. नाशिक, जळगाव जिल्ह्याला सिंचनाचा मोठा फायदा
- सहकारी साखर कारखान्यांना शासन हमीवरील कर्ज परतफेडीसाठी संपूर्ण संचालक मंडळावर जबाबदारी
- शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्या ३० ऑगस्टपर्यंत
- ज्येष्ठ नागरिकांसाठी महामंडळ. सव्वा कोटी ज्येष्ठांना लाभ
- ठाणे येथील महत्वाकांक्षी क्लस्टर योजनेसाठी महाप्रित ५ हजार कोटी निधी उभारणार
- 'बार्टी' च्या 'त्या' ७६३ विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्तीचा संपूर्ण लाभ
- मुंबई महानगरात रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजना झपाट्याने पूर्ण करणार. विविध महामंडळे प्रकल्प राबविणार
- कोल्हापूरचे वारणा विद्यापीठ समूह विद्यापीठ
- कळंबोली येथील पशुवैद्यकीय रुग्णालयासाठी भाडेपट्टा, सेवाशुल्क माफ
- चिपळूण, रामटेक, इचलकरंजी येथील जमिनीच्या आरक्षणात फेरबदल
- श्रीमंत उदयनराजे भोसले यांच्या सरंजाम जमिनींना देण्यात आलेली सूट वंशपरंपरेने त्यांच्या वारसांना
- पाचोऱ्यातील सहकारी सूत गिरणीस शासन अर्थसहाय्य
- सहकार भवनासाठी सायन येथील म्हाडाची जमीन

# अनुसूचित जाती-जमातींचे ठाण्यात जनआंदोलन!

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**☐ प्रतिनिधी**

**झिडके - अंबाडी :** १ ऑगस्ट २०२४ रोजी सुप्रीम कोर्टाद्वारे ७ खंडपीठाने अनुसूचित- जमातीतील ४ जातींची वर्गवारी करून,त्यांना नॉनक्रिमिलेयर लागू करण्यासंदर्भातील आदेश संपूर्ण देशात लागू करण्याचा निर्णय घेतलेला आहे,या सरकारच्या धोरणाचा निषेध करण्यासाठी बुधवार दिनांक-२८/०८/२०२४ रोजी अनुसूचित जाती-जमाती समाज आरक्षण बचाव समिती,महाराष्ट्र राज्य यांच्याकडून जिल्हाधिका?ी कार्यालय ठाणे येथे जनआंदोलन आयोजित करण्यात आले आहे.

अनुसूचित जाती- जमाती समाजाला देण्यात आलेले आरक्षण हे आर्थिक आधारावर नसून,ते हजारो वर्षांपासून झालेल्या सामाजिक,आर्थिक,शैक्षणिक व शारीरिक आदि घटकांचे झालेले शोषण मुक्त करण्यासाठी संविधानीक अधिकार देण्यात आले आहेत. त्यामुळेच अनुसूचित जाती जमातीतील समाज गेल्या अनेक वर्षांपासून आपली सामाजिक प्रगती करीत आहे,असे असतानाच,सुप्रीम कोर्टाने जातीय वर्गवारी करून,नॉनक्रिमिलेयर ची जी अट लागू केली आहे, याबाबत समाजाच्या मनात सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाबाबत अत्यंत संतापाची लाट निर्माण झाली आहे.याचा तीव्र निषेध करण्यासाठी अनुसूचित जाती-जमाती समाज आरक्षण बचाव समिती महाराष्ट्र राज्य ठाणे जिल्ह्याच्या वतीने बुधवार दिनांक-२८/०८/२०२४ रोजी सकाळी ११ते दुपारी २ वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे येथे जनआंदोलन आयोजित करण्यात आले आहे,याबाबतची माहिती पंकज गायकवाड,विकास निकम,या प्रमुख कार्यकर्त्यांकडून वृत्त प्रतिनिधी यांना देण्यात आली आहे.

## स्वच्छतेच्या मुद्यावरुन...

पान १ वरून ▶▶ प्रभागक्षेत्र स्तरावर कार्यरत स्वच्छता अधिकारी आणि स्वच्छता निरीक्षक यांच्या दैनंदिन कार्यवाहीचा आढावा घेऊन प्रभागात कार्यवाही करतांना येणाऱ्या अडचणी, समस्यांचे निराकरण करणेकामी मार्गदर्शन केले तसेच परिसराची पहाणी करुन स्वच्छतेकामी आवश्यक त्या सुचना दिल्या. या भेटी दरम्यान महापालिकेच्या ब प्रभागक्षेत्र कार्यालय, क प्रभागक्षेत्र, फ प्रभागक्षेत्र, ग प्रभागक्षेत्र व ई प्रभागक्षेत्र कार्यालय पसिरात भेट दिली असून पैकी 'ग' व 'ई' प्रभागक्षेत्र परिसरात ठिकठिकाणी अस्वच्छता आढळून आल्याबाबत ३ स्वच्छता निरीक्षक यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला असून यासह उशीरा आलेल्या एकूण ९ सफाई कर्मचारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेल्या आहेत. प्रभागक्षेत्रातील खंबाळपाडा वाहनतळ येथे भेट दिली असता वाहनतळाच्या बाजूस ९ गाडया येऊन थांबलेल्या दिसून आल्या, या वाहन चालक यांच्यावर कारवाई करण्यासाठी आहवाल मागवीण्यात आला आहे. पुढील कालावधीमध्ये अशा प्रकारे नियमीत भेटी देऊन महापालिका क्षेत्रात घनकचरा व्यवस्थापन कार्यवाहीचा आढावा घेण्यात येणार असून त्यानुसार प्रभागातील स्वच्छता विषयक समस्या तातडीने सोडविण्याकामी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतील. तसेच विभागातील जे अधिकारी, कर्मचारी दैनंदिन कार्यवाही करतांना टाळाटाळ अथवा हयगय करतांना आढळून आल्यास संबंधीतांवर तातडीने कारवाई प्रस्तावित करण्यात येणार असल्याचे उपायुक्त अतुल पाटील यांनी सांगितले.

# जखमी गोविंदांच्या उपचारांसाठी पुढे सरसावले एम्स हॉस्पिटल

**इमर्जन्सी हेल्पलाइन जारी करुन संपर्क साधण्याचे आवाहन | मेंदुला किंवा हाडांना दुखापती झाल्यास, तात्काळ वैद्यकीय मदत व घटनास्थळी रुग्णवाहिका उपलब्ध**

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**☐ प्रतिनिधी**

कल्याण : मानवी मनोरा तयार करताना बऱ्याचदा उंचावरून पडल्याने अनेक गोविंदांना अनेक ऑर्थोपेडिक जखम होतात. हातापायाला फ्रॅक्चर, डोक्याला किंवा मेंदूला मार बसून गंभीर दुखापत झालेली होते. अशा स्थितीत जखमी गोविंदांना वेळेवर वैद्यकीय सुविधा मिळणं गरजेचं आहे.

ऑर्थोपेडिक जखम टाळण्यासाठी गोविंदांना वॉर्म अप, स्ट्रेचिंगच्या प्रशिक्षणाची आवश्यकता असते. पिरॅमिड तयार करताना संरक्षणात्मक पॅड व हेल्मेट घालण्यास विसरू नका. गोविंदांनी सुरक्षेला विशेष प्राधान्याने दिले पाहिजे अशी प्रतिक्रिया एम्स हॉस्पिटलचे डॉ. विशाल लापशीया यांनी व्यक्त केली.

एखाद्या गोविंदाला उंचावरून पडल्याने डोक्याला मार लागल्यास त्याला तातडीने रूग्णालयात नेऊन गोल्डन अवरमध्ये उपचार मिळणं गरजेचं असतं. परंतु, योग्य सोयी-सुविधा न मिळाल्याने उपचारास विलंब होतो. वेळीच उपचार न मिळाल्याने मृत्यू होण्याचीही दाट शक्यता असते. हे जाणून दहीहंडी उत्सवाचा दरम्यान जखमी गोविंदांना तातडीने वैद्यकीय सुविधा मिळाव्यात, या उद्देशाने एम्स हॉस्पिटलने आपत्कालीन हेल्पलाइन सुविधा उपलब्ध करुन दिली जात असून +९१ ७५०६२७४९५९ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन रुग्णालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

गोविंदांनी उत्सवादरम्यान सुरक्षा मार्गदर्शक तत्त्वांचे पालन केले पाहिजे. कोपर आणि गुडघे तसेच मनगटासाठी पॅड तसेच डोक्याच्या संरक्षणासाठी हेल्मेटचा वापर करावा. या उत्सवादरम्यान जखमी गोविंदांना तातडीने मदत करण्यासाठी, एम्स हॉस्पिटलने आपत्कालीन हेल्पलाइन नंबर जारी केला असून या माध्यमातून त्वरित वैद्यकीय मदत उपलब्ध करून दिली जाणार आहे. याकरिता गोविंदांना गंभीर दुखापत झाल्यास विलंब न करता आमच्याशी संपर्क साधा असे आवाहन डॉ. कपिल खंडेलवाल यांनी केले आहे.

# अटाळी-वडवली-आंबिवली परिसरातील मूलभूत सुविधांसाठी शिवसेना शिंदे गटाचे केडीएमसी आयुक्तांना साकडे

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**☐ प्रतिनिधी**

**कल्याण :** कल्याण डोंबिवली मनपाक्षेत्रातील अटाळी, वडवली, आंबिवली परिसरातील मूलभूत, पायाभूत सुविधा मार्गी लागण्यासाठी शिवसेना शिंदे गटाच्या वतीने निवेदन गुरुवारी देण्यात आले. केडीएमसी आयुक्त यांच्या दालनात शिवसेना उपशहर प्रमुख माजी नगरसेवक दुर्योधन पाटील यांच्या मार्गदर्शनाने आणि शिवसेना शाखेच्या वतीने अटाळी-आंबिवली परीसरातील विविध समस्यांबाबत लेखी निवेदन देऊन चर्चा केली.



त्यात प्रामुख्याने आंबिवली स्थानक समांतर रस्ता डीपीआर नुसार करणे गरजेचे आहे. आंबिवली शहाड जोडणारा जुन्या पूलाचे स्ट्रक्चरल ऑडीट करणे व लगत नवीन पूल करणे, आंबिवली पश्चिम येथील पाणी समस्या सोडविण्यासाठी पूर्व पश्चिमला रेल्वे खालून मंजूर असलेल्या पाईपलाईनचे काम करण्याबाबत, आंबिवली परिसरात नवनवीन गृह संकूल उभे राहत आहेत तरी विभागातील सर्व रस्ते डीपीआर नुसार बनविणे. आंबिवली परिसरातील आरक्षीत भुखंडावर अतिक्रमण होण्यापूर्वी ताब्यात घेणे.

'अ' प्रभाग क्षेत्रात गेली १ वर्ष मलनिःसारण गाडी नसल्याने नागरिकांचे हाल होत आहेत. उल्हास नदी मध्ये दरवर्षी जलपर्णी येऊन पाणी दुषित होत आहे, लाखो रुपयांचे टेंडर काढून समस्या सुटत नाहीत तरी कायम स्वरुपी उपाय शोधणे गरजेचे आहे. मोहने जलशुध्दीकरण केंद्र हे मोहिली येथे शिफ्ट होत आहे तरी मोहने जलशुध्दीकरणाच्या जागेवर आंबिवली व परिसरातील नागरीकांसाठी पर्यटन स्थळ होईल अशी योजना करण्यात यावी.

प्रभाग क्रमांक ६ विभागातील महानगरपालिका शाळेत शिक्षकांच्या संख्या वाढविणे आणि शाळांची दुरुस्ती करणे.

प्रभागातील ड्रेनेजची खुप मोठी समस्या आहे ती लवकरात लवकर सोडवावी. प्रभागातील रिंगरुटचे काम लवकरात लवकर मार्गी लावणे आणि बाधित नागरिकांना लवकरात लवकर मोबदला मिळावा. गणेशोत्सवापूर्वी आंबिवली पश्चिम व पूर्व येथील रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यात यावे. यासर्व मागण्याचे निवेदन कल्याण डोंबिवली मनपा आयुक्त इंदुराणी जाखड यांना शिवसेनेच्या शिष्टमंडळाने दिले.

या शिष्टमंडळात माजी नगरसेविका हर्षली थाविल चौधरी, विभागप्रमुख रमण तरे, उपविभाग प्रमुख विशाल रोकडे, युवासेना समन्वयक विजय चौधरी, युवासेना उपविभाग प्रमुख व्यंकटेश गांधी, प्रेम पाटील, शुभम सिंग उपस्थित होते.

# कल्याण शहर शिवसेनेच्या दहीहंडीत सामाजिक उपक्रमांसोबत रील स्पर्धेचे आयोजन



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**☐ शहर प्रतिनिधी**

**कल्याण :** सामाजिक भान जपून आपली संस्कृती परंपरा कायम राखणारा दहीहंडी उत्सव अशी शिवसेना कल्याण शहर शाखेच्या दहीहंडी उत्सवाची ओळख आहे. यंदाच्या दहीहंडीचे हे १६ वे वर्ष असून यंदाही त्याचे भव्य स्तरावर आयोजन करण्यात आल्याची माहिती शहर प्रमूख रवी पाटील यांनी प्रसिध्दी माध्यमांना दिली. तसेच सामाजिक उपक्रमासोबतच यावर्षी युवा वर्गासाठी अनोखी रिल स्पर्धा हे यंदाच्या उत्सवाचे आकर्षण असणार आहे.

दहीहंडी हा महाराष्ट्रातील एक प्रमुख उत्सव असून गेल्या दोन दशकांपासून त्याला अतिशय भव्य स्वरुपात त्याचे साजरीकरण केले जात आहे. सोमवारी २६ ऑगस्ट रोजी श्रीकृष्ण जयंती असून मंगळवारी २७ ऑगस्ट रोजी गोपाळकाला उत्सव होणार आहे. शिवसेना शहर शाखेची दहीहंडी ही कल्याणातील प्रमूख दहीहंडी उत्सवापैकी एक समजला जातो. याठिकाणी आपली सांस्कृतिक परंपरासोबतच सामाजिक भानही जपण्यात येते. दरवर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या या दहीहंडी उत्सवातून अनावश्यक खर्च टाळून समाजातील गरजू व्यक्तींना, देशासाठी लढताना वीरमरण आलेल्या सैनिकांच्या कुटुंबाला, नैसर्गिक आपत्तीग्रस्त गावकऱ्यांना आर्थिक मदत करण्यात आली आहे. यावर्षी अपघातात निधन झालेल्या साईभक्तांच्या मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी शिवसेना शहर शाखेतर्फे उचलण्यात आल्याची माहिती यावेळी शहरप्रमूख रवी पाटील यांनी दिली.

तर दहीहंडी उत्सवात सहभागी होणाऱ्या युवकांचा विचार करता यंदा प्रथमच अनोख्या मोबाईल रिल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी शिवसेना शहर शाखेच्या दहीहंडी उत्सवाचे मोबाईल चित्रीकरण करून ज्या स्पर्धकाच्या रिलला सोशल मीडियावर लाइक्स, कमेंट आणि व्ह्यू सारखी अधिक पसंती मिळेल त्यांना रोख बक्षिसे देण्यात येणार आहेत. या स्पर्धेसाठी नियुक्त जजेसकडून सहभागी स्पर्धकांच्या रिल्सचे कॅमेरा अँगल, क्रिएटीव्हीटी आदी प्रमुख घटकांचा विचारही केला जाणार आहे. या रिल स्पर्धेतील प्रथम विजेत्याला २५ हजार, द्वितीय विजेत्याला १५ हजार आणि तृतीय विजेत्याला ११ हजार रुपयांचे बक्षीस देण्यात येणार असल्याची माहिती शहरप्रमूख रवी पाटील यांनी यावेळी दिली आहे. यावेळी शहरप्रमूख रवी पाटील यांच्यासह उपशहरप्रमुख सुनील खारूक, नितिन माने, नरेंद्र कामत, दुर्योधन पाटील, विनोद गायकवाड, विभागप्रमुख भाऊ व्यवहारे, मधू सातवे, उपविभागप्रमुख कुणाल कुलकर्णी, शाखाप्रमुख संतोष घोलप, सागर जाधव, उपशाखा प्रमुख गणेश वेदापठक, युवासेना सहसचिव प्रतिक पेणकर, भिवंडी लोकसभा विस्तारक सूचेत डामरे, जिल्हा सचिव योगेश पाटील, उपशहरप्रमुख मेघन सल्पी, अनिरुद्ध पाटील, शाखा प्रमुख मंदीर बेलोटे, उपशाखा ओमकार हारावडे, संतोष गडकरी, दिनेश पाटील, रवी सकपाळ, रामदास भालेराव, आशिष सकपाळ, सोहम बेनकर, भावेश चौधरी आदी उपस्थित होते उपस्थित होते.

# मोरया हेल्थकेअर संचलित निरामय हॉस्पिटलचा शुभारंभ

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** मोरया हेल्थकेअर प्रा, लिमिटेड संचलित निरामय हॉस्पिटल टिटवाळा गणपती मंदिरजवळ गुरुवली रोड येथे बांधण्यात आले आहे. टिटवाळयासह ग्रामीण भागात भव्य निरामय हॉस्पिटल जनतेच्या सेवेसाठी चोवीस तास सुरु करण्यात आले आहे.

डॉ. सिध्दार्थ निकम यांनी सांगितले की मोरया ग्रुपच्या वतीने टिटवाळा परिसरात निरामय हॉस्पिटल सुरु करण्यात आले आहे. हे हॉस्पिटल चोवीस तास सुरु राहणार असून डॉ. हेमंत मिश्रा, डॉ. संदीप पाटील, डॉ. पुष्पराज स्वामी यांच्यासह इतरही डॉक्टर तज्ञ उपलब्ध राहणार आहेत. तसेच आयसीयू, जनरल वॉर्ड, ओपीडी, मेडीसेन, जनरल सर्जरी, प्लॉस्टिक सर्जरी, केमोथेरोपी, हृदय तज्ञ डॉक्टर, तसेच रुग्णवाहिका सेवा उपलब्ध आहे. जर एखाद्या रुग्णाला घरून येणासाठी वाहतूक सेवा नसल्यास हॉस्पिटलमध्ये फोन केल्यास रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच गोरगरीब जनतेसाठी महात्मा फुले आरोग्य योजनाही सुरु करण्यात आलेली आहे. सर्वसाधारण जनतेला हॉस्पिटल फायदा झाला. सुसज्ज हॉस्पिटल असून विविध आजारावर डॉक्टर उपलब्ध आहेत.

यावेळी मोरया ग्रुपचे मनोज पवार, उद्योजक भावेश गुजरे, हर्षल पवार, तसेच शुभेच्छा देण्यासाठी माजी नगरसेवक संतोष तरे, मयुर पाटील, समाजसेवक राजाभाऊ पातकर, राष्ट्रवादीचे टिटवाळा शहर अध्यक्ष मोरेश्वर तरे, संतोष दिक्षीत, रवींद्र जाधव, राष्ट्रवादी पवार गटाचे तालुका अध्यक्ष बाळाराम कोर, आनंता देसले, उत्तम शिरोसे यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कल्याणातील भाजपा पदाधिकारी राजाभाऊ पातकर पुन्हा स्वगृही काँग्रेसमध्ये

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**☐ प्रतिनिधी**


**कल्याण :** लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर आणि विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर महाराष्ट्रात प्रमूख राजकीय पक्षांमधून इनकमिंग - आऊटगोईंगला सुरुवात झाली आहे. यामध्ये आता कल्याणातील भाजप नेत्यांचीही भर पडली असून त्यांनी भाजपला सोडचिठ्ठी देत पुन्हा काँग्रेसचा हात आपल्या हाती धरला आहे. काही दिवसांपूर्वीच राकेश मुथा यांच्या काँग्रेस प्रवेशापाठोपाठ आता राजाभाऊ पातकर यांनीही स्वगृही परतण्याचा निर्णय घेतला आहे. काँग्रेस जिल्हाध्यक्ष सचिन पोटे यांनी याबाबत पत्रकार परिषदेत माहिती दिली. यावेळी महिला काँग्रेस जिल्हाध्यक्षा कांचन कुलकर्णी, राकेश मुथा आदी पदाधिकारी उपस्थित होते.



लोकसभा निवडणुकीमध्ये महाराष्ट्रात मतदारांनी महायुतीऐवजी महाविकास आघाडीच्या उमेदवारांना निवडून दिले. मतदारांच्या या भूमिकेच्या पार्श्वभुमीवर गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रात मोठ्या संख्येने इनकमिंग - आऊटगोइंगला सुरुवात झाली आहे. २०१४ किंवा त्यानंतरच्या काळामध्ये काँग्रेस आणि राष्ट्रवादीला सोडून भाजपमध्ये मोठ्या संख्येने इनकमिंग झाले. मात्र नुकत्याच लागलेल्या लोकसभा निवडणुक निकालानंतर राज्यातील आगामी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर भाजपमध्ये गेलेले अनेक पदाधिकारी पुन्हा स्वगृही परतत आहेत.

कल्याण डोंबिवली शहर जिल्हा काँग्रेसमध्येही सध्या हेच चित्र दिसत असून अवघ्या काही दिवसांच्या फरकाने दोघा नेत्यांनी भाजपला सोडचिठ्ठी देत पुन्हा काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. ज्यामध्ये राकेश मुथा आणि आता राजाभाऊ पातकर यांचा समावेश आहे. भाजप हा केवळ लेना बँक असून ज्यावेळी कार्यकर्त्यांना द्यायची वेळ येते तेव्हा त्यांना कोणतीही जबाबदारी द्यायची नाही. केवळ आपल्या दिखाव्यासाठी वापर करायचा अशा शब्दांत जिल्हाध्यक्ष सचिन पोटे यांनी भाजपवर टीका केली आहे. शेतकरी असो, युवक असो, बेरोजगारीचा प्रश्न असो अशा सर्वच क्षेत्रात भाजप सरकार अपयशी ठरले असून त्यांच्या या लोकशाहीविरोधी धोरणांना कंटाळून आमचे जुने सहकारी काँग्रेसमध्ये परतत असल्याची प्रतिक्रियाही पोटे यांनी यावेळी दिली.

तर आपण एक बहुजन समाजातील कार्यकर्ता असून भाजपची सध्याची ध्येयधोरणे आपल्याला अजिबात पटत नाहीयेत. भाजपमध्ये सध्या ज्या प्रकारचे राजकरण सुरू आहे ते आपल्याला न पटणारे आणि आपल्या तत्वात न बसणारे आहे. त्यामुळे आपण पुन्हा काँग्रेसमध्ये परतण्याचा निर्णय घेतल्याची माहिती राजाभाऊ पातकर यांनी प्रसिद्धी माध्यमांना दिली.




'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे तथा कार्यकारी संपादक विजय गोविंद यादव यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९१५८०७८६०१ E Mail – jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी